MHAH230038772020

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक २११/२०२० मधील**

**निशाणी क्र. ६४ खालील आदेश**

[०१] प्रस्तुत अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी सादर केलेला आहे.

[०२] अर्जाप्रमाणे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. २ड. प्रियंका अवधुत कासारे यांचे नाव दाव्यात नमुद करताना टंकलिखीत दोषामुळे नजरचुकीने व अनावधानाने प्रियंका अवधुत कातोरे असे चुकीचे नमुद झाले आहे. तसेच, प्रियंका अवधुत कासारे यांचे माहेरकडील नाव प्रियंका संदीप धालवडे असे असून तशी सातबारा सदरी नोंद आहे. त्यामुळे दाव्यात योग्य न्यायदान होण्यासाठी अर्जात सुचीत केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. २ड यांचे नाव प्रियंका अवधुत कासारे उर्फ प्रियंका संदीप धालवडे असे प्रस्तावित नावाची दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्ती मुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे वादीने दुरुस्ती करण्यासाठी वर नमुद मागणीसह प्रस्तुत अर्ज सादर केला.

[०३] प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जावर विहीत मुदतीत म्हणणे सादर न झाल्याने त्यांच्याविरुध्द प्रस्तुत अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

[०४] अर्जाच्या सुनावणीवेळी वादीतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] वादीच्या कथनानुसार सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ड यांचे नाव टंकलिखीत दोषामुळे नजरचुकीने व अनावधानाने चुकीचे नमुद झालेले आहे. अर्थातच प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत वादी सुचित करत असलेली प्रस्तावित दुरुस्ती न झाल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल व

त्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कापासुन कायमचे वंचीत रहावे लागेल. या अनुषंगाने दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ड यांचे नावाबाबत वादी सुचित करत असलेली प्रस्तावित दुरुस्ती करणेस वादीला परवानगी देणे आवश्यक ठरते. अर्थातच सदर प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून त्याबाबत परवानगी दिल्यास प्रतिवादींना प्रस्तावित दुरुस्ती बाबत त्याचे म्हणणे दाखल करण्याची संधी मिळणार असल्यामुळे सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे अपरिमीत असे नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. एकुणच वर नमुद विश्लेषणाचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**(१)** प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणेची दुरुस्ती पुढील तारखेपर्यत दाव्यात करण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

**(३)** प्रस्तुत अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

**(४)** सदरचा आदेश पीठासनावरुन उद्घोषित करण्यात आला.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.01.22 17:59:06 +0530

(प्रविण वि. पाटील)

दिनांक:- २२-०१-२०२६.

सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | : | २२-०१-२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | २२-०१-२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | : | २२-०१-२०२६ |